प्रकरण चौथे

# मूल्ये व समायोजन क्षमता

**प्रकरण चौथे**

# मूल्ये व समायोजन क्षमता

४.१ प्रस्तावना

४.२ मूल्ये म्हणजे काय ?

४.३ संशोधनासाठी घेतलेली मूल्ये.

१. सैध्दांतिक मूल्य

२. आर्थिक मूल्य

३. सामाजिक मूल्य

४. सौंदर्यविषयक मूल्य

५. राजनैतिक मूल्य

६. धार्मिक मूल्य

४.४ समायोजन क्षमता

१. समायोजन म्हणजे काय ?

२. समयोजनाचे प्रकार

३. समायोजनाची लक्षणे

४. समायोजनाची गरज

४.५ संशोधनासाठी निवडलेल्या समायोजन क्षमतेची क्षेत्रे

१. शालेय व सर्वसामान्य वातावरण क्षमता.

२. सामाजिक, मानसिक, भौतिक, समायोजन क्षमता.

३. व्यावसायिक संबंध समायोजन क्षमता.

४. व्यक्तिगत जीवन समायोजन क्षमता.

५. आर्थिक व व्यावसायिक समाधान समायोजन क्षमता

४.६ समारोप

**प्रकरण चौथे**

# मूल्ये व समायोजन क्षमता

४.१ प्रास्ताविक

प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधिकेने माध्यमिक शिक्षकांची मूल्ये आणि त्यांची विविध क्षेत्रामध्ये असणारी समायोजनक्षमता अभ्यासण्याचा प्रयत्न केलेला आहे. यासाठी मूल्य म्हणजे काय व समयोजन म्हणजे काय याची तात्विक माहिती या प्रकरणामध्ये दिलेली आहे. तसेच संशोधनासाठी निवडलेली ६ मूल्ये व ५ क्षेत्रातली समायोजन क्षमता याची थोडक्यात माहिती दिलेली आहे.

## ४.२ मूल्य म्हणजे काय ?

"मूल्य शिक्षण म्हणजे सुसंस्काराचे शिक्षण"

"मनुष्याच्या व्यक्तिमत्वातील ज्या ज्या गोष्टींना समाजामध्ये मूल्य आहे ती गोष्ट म्हणजे मूल्य होय."

कोणती मूल्ये आपण आचरणात आणायचीत, ती धारण करुन जीवन संपन्न करावयाचे याचे व्यक्तीला स्वातंत्र्य असले तरी समाज संस्कृतीच्या निरीक्षणातून आणि परिशीलनातून मूल्यांची निर्मिती झालेली असते. मूल्य आचरणात आणताना व्यक्ति प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरित्या समाज हिताला सामोरी जात असते.

"नैतिक बौध्दिक अथवा सौंदर्यविषयक दृष्टीकोणातून आपल्याला ज्या बद्दलची पसंती जाणवते त्यालाच मूल्य म्हणता येईल. "

" मूल्य हा शब्द आपल्या मनोधारणेची विशिष्ट वा घडण दाखविते "

"मूल्य हया शब्दाला इंग्रजीमध्ये **Value** असा प्रतिशब्द आहे. या संज्ञेचा अर्थ खालील प्रमाणे आहे"

" Belief about what is desirable or undesirable values reflect the culture of society and if the individual accepts a value for him / herself it may become a goal"

14873

येथे **मूल्य शिक्षण** हा शब्द सुसंस्कार या शब्दाच्या अर्थाशी निगडीत आहे. **मूल्य** म्हणजे मानवी समाजातील सत् ची निर्मिती होय. म्हणून मूल्यशिक्षण म्हणजे सुसंस्काराचे रोपण मानावेच लागते. मानवी जीवनाला आवश्यक असणाऱ्या सद्‌गुणांचे रोपण करण्यासाठी त्या स्वरुपाचे संस्कार मुलांच्यावर करावे लागतात. हे संस्कार शिक्षणानेच शक्य आहे. म्हणून मूल्यशिक्षण म्हणजे सुसंस्कार असे म्हटले आहे. मानवी संस्कृतीतील सद्‌गुणांनी मूल्य ही संज्ञा निर्माण केली आहे. येथे समूहमनाचा, समूहजीवनाचा, व्यक्तिच्या सामाजिक व्यवहाराच्या आशा आकांक्षेचा विचार अभिप्रेत आहे. सामाजिक जीवनात व्यक्तिवर्तन व्यवहार जीवन कसे असावे याचे आदर्शीकरण मूल्य या संज्ञेमध्ये आहे.

ज्याची आकांक्षा धरावी वा पाठपुरावा करावा अशी गोष्ट म्हणजे मूल्य. मूल्य म्हणजे मानवी समाजातील उत्तम, सुंदर, आदर्श यांची निर्मिती होय. ही निर्मिती शिक्षणाने साध्य व्हावी आणि यासाठी शिक्षकांनी त्यांच्यावर जाणीवपूर्वक संस्कार करावेत अशी अपेक्षा केली जाते. मूल्य शिक्षण म्हणजे शिक्षणाचा मूळ आधार होय. शिक्षणातूनच सुसंस्कृत व्यक्तिमत्व आपल्याला विकसीत करावयाचे असते आणि या सुसंस्कृत मानवाने मानवी मूल्यांची जोपासना केली पाहिजे. सध्या शिक्षणाचा प्रसार जरी वेगाने होत असला तरी निर्माण होणाऱ्या नविन पिढीचा नैतिक स्तर खालावलेला / घसलेला दिसून येतो. आजच्या संगणकाच्या युगामध्ये माहिती प्रसारणाच्या युगामध्ये नविन पिढी ज्ञानग्रहणाच्या बाबतीत जुन्या पिढीपेक्षा दोन पाऊले पुढे असेल / आहे. पण व्यवहाराच्या वर्तनाच्या बाबतीत मात्र ती जुन्या पिढीच्या मागेच असलेले आपल्याला जाणवते. म्हणूनच १९६४ मध्ये डॉ. कोठारी यांनी शिक्षण आणि राष्ट्रीय विकास या शिक्षण आयोगात आध्यात्मिक आणि नैतिक मूल्यांची जोपासना हे शिक्षणाचे प्रमुख उद्दिष्ट सांगितलेले आहे.

शिक्षणातून सुसंस्कारीत विद्यार्थी निर्माण होणे ही आजची गरज आहे. भारतामध्ये सद्याच्या परिस्थितीचा विचार केला तर असे दिसून येते की, रोज मारामारी, खून, दरोडे अशा शब्दांनी युक्त अशी वाक्ये वर्तमानपत्रामध्ये वाचावयास मिळतात. अशा गोष्टीचे प्रमाण इतके वाढले आहे की, सर्वजण लहानापासून थोरापर्यंत राजकारण्यापासून तत्वज्ञापर्यंत सर्वजण आजच्या शिक्षण प्रणालीला दोष देतात. पण हे वाढलेले प्रमाण कमी करण्याची ताकद फक्त शिक्षणामध्येच आहे. शिक्षण हेच समाजपरिवार्तनाचे प्रमुख साधन आहे असे मानले तर शिक्षणातून किती प्रमाणात समाजपरिवर्तन होऊ शकेल याचा विचार करावा लागेल. शिक्षण प्रक्रियेमध्ये अनेक घटकांचा समावेश असलेला आढळून येतो. उदा. शिक्षक, विद्यार्थी,

भौतिक घटक, प्रशासकीय घटक इ. अनेक घटक असल्याचे आढळतात. या सर्व घटाकांमुळेच शिक्षण प्रक्रिया पूर्ण होते. हे सर्व घटक जर व्यवस्थित क्षमतेने कार्य करीत असतील तरच आपली शिक्षण प्रक्रिया व्यवस्थितपणे कार्य करु शकेल. या सर्व घटकापैकी महत्वाचा घटक म्हणजे शिक्षक. संस्कारक्षम विद्यार्थी तयार करण्यामध्ये सर्वात महत्वाचा वाटा असतो तो शिक्षकांचा. शिक्षकांनी कितीही चांगल्या प्रकारची मूल्ये रुजविण्याचा प्रयत्न केला तरी ती विद्यार्थ्यांमध्ये जेव्हा रुजतील, जेव्हा शिक्षक मूल्यवान असेल, संस्कारक्षम असेल. विद्यार्थी हे शिक्षकांचे अनुकरण करीत असतात. यासाठी शिक्षकांच्याकडे नुसती विद्वत्ता असून चालणार नाही. तर त्यांचेकडे उत्तम संस्कार, नैतिकता, धार्मिकता, सौंदर्यदृष्टी, उत्तम चारित्र्य असायला हवे. या सर्वांच्या आधारावरच तो विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार करु शकतो. उत्तम नागरिक बनवू शकतो. यातून संपूर्ण समाजाचा विकास होऊ शकतो.

## ४.३ संशोधिकेने संशोधनासाठी घेतलेली मूल्ये

संशोधिकेने प्रस्तुत संशोधनामध्ये माध्यमिक शिक्षकांच्यामध्ये असणारी मूल्ये शोधण्यासाठी खालील मूल्ये घेतलेली आहेत :

१. सैध्दांतिक मूल्य

२. आर्थिक मूल्य

३. सामाजिक मूल्य

४. सौंदर्यविषयक मूल्य

५. राजनैतिक मूल्य

६. धार्मिक मूल्य

### ४.३.१ सैध्दांतिक मूल्य

सैध्दांतिक म्हणजे तत्वज्ञानविषयक मूल्ये याचा संबंध प्रत्यक्ष आचरणाशी व्यवहाराची वर्तनाशी येतो. त्यातूनच सद्गुणांचा विकास अपेक्षित असतो. प्रत्येक देशात समाजात विशिष्ट नितीनियम आस्तित्वात असतात. समाज व्यवस्थेच्या दृष्टीने या निती नियमांचे पालन समाजातील प्रत्येक व्यक्तीने करावी अशी

समाजाची अपेक्षा असते.

प्राचीन काळी शिक्षण संपल्यानंतर व्यक्तिला गृहस्थाश्रमात प्रवेश करण्यापूर्वी समावर्तन प्रसंगी जो उपदेश केला जाई तो असा असे... सत्यवंद, धर्मक्षचर, स्वाध्यायत् मात्रमद् ! हा उपदेश म्हणजेच सदाचारांची नैतिकतेची शिकवणच होय. जीवन जगत असताना आचरण कसे असावे याचे मार्गदर्शनच असे.

आज झटक्यात कसे श्रीमंत होता येईल याकडे प्रत्येकाचे लक्ष असते. छोटया मोठयांना वाकून नमस्कार करणे कमीपणाचे समजतात. वडीलांबरोबर दारु, सिगारेट पिण्यात धन्यता मानतात. त्यामुळे आजच्या भारतीय समाजात शिक्षणातून शिलसंपन्न पिढी घडविली पाहिजे. यासाठी थोडे कठोर व्हावे लागले तरी चालेल पण योग्य वयातच मुलांच्या मनोविकारांना योग्य वळण लावणे, त्यांच्यासमोर योग्य आदर्श ठेवणे. त्यांच्या भावी आयुष्याच्या दृष्टीने त्यांच्या वर्तनात सुधारणा कशी करता येईल याचा विचार करणे, त्यासाठी वेगवेगळे उपक्रम राबविणे हे शिक्षणाचे कार्य पर्यायाने शिक्षकाचे कार्य आहे. यासाठी शिक्षक स्वत: आदर्श असावा. तरच तो आदर्श नागरिक निर्माण करेल.

### ४.३.२. आर्थिक मूल्य

आर्थिक मूल्य म्हणजे अर्थविषयक याचा संबंध प्रत्यक्ष जीवनाशी आचरणाशी येतो. आर्थिक मूल्य म्हणजे प्रत्येक व्यक्ति जीवन जगत असताना अर्थार्जन करीत असते. हे अर्थार्जन करीत असताना व्यक्ति पैशाला किती महत्व देते, पैसा कोणत्या मार्गांना मिळविते, पैसा कमविणे हे प्रत्येकाचे ध्येय असणे. गरजेचे असते. पण तो कोणत्या मार्गाने कमवावा, योग्य मार्गाचा अवलंब करुन, दुसऱ्याची फसवणूक करुन, लुबाडून तो मिळवू नये. याचे संस्कार शिक्षणातून पर्यायाने शिक्षकाने विद्यार्थ्यांमध्ये रुजविण्यास हवेत. सत्य, प्रामाणिकता, पिळवणूकीस आळा इ. मूल्ये शिक्षकाने विद्यार्थ्यांमध्ये संक्रमित करावयास हवी. यासाठीच शिक्षकाचे आचरण वर्तन शुध्द असावयास हवे.

### ४.३.३. सामाजिक मूल्य

समाज हा अनेक घटकांचा मिळून बनलेला आहे. समाज हा मानवांचा मिळून बनलेला असतो. या वैयक्तिक वर्तनाबरोबरच सामाजिक वर्तनाला जास्त महत्व असते. यामध्ये समाजाचा विचार वैयक्तिक पातळीवर न करता सामाजिक पातळीवर केला जातो. सामाजालाही एका व्यक्तीच्या नव्हे तर सर्वांच्या हिताचा, कल्याणाचा विचार करावा लागतो. यासाठी काही नियमांचे पालन करणे अत्यंत आवश्यक असते. समाजामध्ये काही अनिष्ट रुढी, परंपरा, निती, नियम आहेत. त्याचे पालन प्रत्येकाने करणे गरजेचे असणे आणि ही जबाबदारी शिक्षणावर येते. आजच्या नविन पिढीला सामाजिक जबाबदारीची जाणीव शिक्षणातून करुन देता येते. समाजविघातक कृत्यांना संघटीतपणे तोंड देण्याचे सामर्थ्य शिक्षणाने विद्यार्थ्यांमध्ये निर्माण केले पाहिजे. थोर मोठया व्यक्तिंनी प्रतिकूल परिस्थितीतही तत्वांची कास सोडली नाही. समाजविरोधी कृत्य केले नाही. समाज मूल्यांनुसार आचरण केल्यामुळे ते कसे मोठया पदास पोहचले हे विद्यार्थ्यांना शिक्षणातून सांगता येईल.

थोडक्यात समाजनिष्ठ वागणूक सामाजिकता सामाजिक कार्यात योगदान, गरीब श्रीमंत, वर्ण–जाती, श्रेष्ठत्व–हिनत्व यांना थारा न देता समत्व दृष्टी, हीनदीन, अपंग, मागासलेल्या विषयी कणव व त्यांना यथाशक्ती मदत करणे सामाजिक ऋण फेडण्याची वृत्ती सत्संग व कुसंगापासून अलिप्तता या मूल्यांची जोपासना विद्यार्थ्यांमध्ये करावी.

### ४.३.४. सौंदर्यविषयक मूल्य

साहित्य, संगीत, कला, विहिन, साक्षात, पशू पुच्छविषाणहिन..! या संस्कृत वचनानुसार मानवी जीवन साहित्य, संगीत, सौंदर्य यांच्या आस्वादाखेरीज रुक्ष निरस कंटाळवाणे आहे. जीवन जगण्यासाठी जरी याची आवश्यकता नसली तरी जीवनात आनंद प्राप्त करण्यासाठी जीवन सुखी, समाधानी, उत्साही करण्यासाठी याची नितांत गरज आहे. दैनंदिन धाकाधकीच्या यांत्रीकी बेगडी मानवी आयुष्यातील मानसिक थकवा दूर करुन जीवनात चैतन्य निर्माण करण्याची अद्भूत शक्ती या साहित्य, संगीत, कलेमध्ये आहे. प्रत्येक व्यक्ती ही जरी उत्तम कलाकार, लेखक, गायक होऊ शकली नाही तरी त्या साहित्य, संगीत, कलेमधील सौंदर्याचा रसास्वाद तरी निश्चित घेऊ शकते. तेव्हा ही सौंदर्यात्मक दृष्टी, रसिकता प्रत्येकाजवळ असणे आवश्यक असते.

उच्च प्रतीचे छंद जोपासणे (गायन, चित्र, साहित्य, वाचन, लेखन, नृत्य, वादन, वस्तुसंग्रह) उच्च सांस्कृतिक कार्यक्रम (भजन, किर्तन, प्रवचन, नाटय, संगीत) स्वत: करणे व त्यात सहभागी होणे, विविध कार्यक्रम साजरे करणे आवश्यक असते. त्यातून आनंद घेणे हीन दर्जाचे कार्यक्रम न करणे. म्हणजेच प्रत्येकाजवळ सौंदर्यात्मक दृष्टी, रसिकता असेल तर त्याचे जीवन आनंदी बनते. शिक्षकाजवळ अशी सौंदर्यात्मक दृष्टी असेल तर तो विद्यार्थ्यांमध्ये सौंदर्यात्मक मूल्य चांगल्या प्रकारे रुजवू शकेल.

## ४.३.५ राजनैतिक मूल्य

राजनैतिक मूल्य हे व्यक्तीच्या जीवनाशी, वर्तनाशी निगडीत आहे. व्यक्तिचा प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष राजकारणाशी संबंध येत असतो. राजकारणामध्ये ज्या पक्षाचे अनुयायी आहेत, त्या पक्षाची शिस्त पाळणे, त्या पक्षाच्या धोरणानुसार कार्य करणे इत्यादी गोष्टी येतात. परंतु दुर्देवाने आज दलबदलूची संख्या वाढली आहे. लाखो रुपयामध्ये आमदार, खासदार विकले जातात असा समज आहे. आमिष दाखवून पक्षनिष्ठा बदलविली जात आहे. त्यामुळे अस्थिरता, अविश्वास, अशांतता, अव्यवस्था अकारणच वाढली आहे वाढत आहे. हे थांबविण्यासाठी भारतीय समाजामध्ये शिक्षणामधून नविन पिढीमध्ये खरी राष्ट्र भक्तीची भावना विकसित केली पाहिजे. योग्य नेतृत्वाचा विकास केला पाहिजे. जागरुकतेने राज्याचा विकास कसा करता येईल याची जाणीव विकसित केली पाहिजे.

## ४.३.६. धार्मिक मूल्य

धार्मिकता म्हणजे आध्यात्मिकता, आस्तिकता, परमेश्वरावरील श्रध्दा या भावनेतून इतर प्राण्याकडे इतर व्यक्तीकडे पाहण्याची दृष्टी बदलते. ज्या परमेश्वराने आपणास घडविले, त्याच परमेश्वराने इतरांनाही घडविले आहे. त्यामुळे आपल्याप्रमाणेच त्यांनाही सुख दु:खाची जाणीव होत असेल. या कल्पनेतून नकळत इतर प्राण्यांविषयी तसेच मानवाविषयी समभाव विकसित होतो. हा भाव अर्थातच मनोमय अनुभुतीवर आधारीत असतो. त्यामुळे मानव सहदय, प्रेमळ, दयाळू बनतो. त्याच्यात विनम्रता येते. यातूनच बंधुत्वाची भावना विकसित होते. दया, क्षमा, शांती हया गुणांचा विकासही या मूल्यातून होतो.

धर्म म्हणजे समाजधारणेसाठी आचरणाची कर्तव्ये यात देव मानणे व त्या शक्तीची उपासना करुन

स्वत:ला त्या रुपापर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न करणे हे महत्वाचे कर्मकांड करणे म्हणजे धर्म नव्हे. सर्व भूतहितरसता म्हणजे देवपूजा व धर्म होय. त्याच धर्मांधता, धर्मद्वेष यांचा अभावच असला पाहिजे. तो पाळणयसाठी भजन, पूजन, ध्यानधारणा, जप, तप करुन मानवता, सर्वभूतसेवा करण्यात व्रत घेणे हे महत्वाचे मूल्य आहे. यातूनच आध्यात्मिक उन्नती साधता येते. आजच्या अस्थिरतेच्या काळात या मूल्यांची नितांत आवश्यकता आहे.

## ४.४. **समायोजन क्षमता** (Adjustment)

प्रस्तुत संशोधनामध्ये संशोधिकेने माध्यमिक शिक्षकांच्या समायोजन क्षमतेचा अभ्यास केलेला आहे. यामध्ये समायोजन क्षमतासाठी पाच क्षेत्राची निवड केली आहे.

**समायोजन (Adjustment)**

व्यक्ती जीवन जगत असताना किंवा व्यक्तीच्या जीवनाची वाटचाल चालू असताना व्यक्तीच अनेक प्रकारे विकास होत असतो. हा विकास होत असताना व्यक्तिला सभोवतालच्या परिस्थितीशी मिळते जुळते घ्यावे लागते. म्हणजेच त्याला परिस्थितीशी समायोजन साधावे लागते. परिस्थितीशी व्यक्तिचे समायोजन झाले तरच व्यक्तीचे मन निरोगी राहते आणि परिस्थितीशी जर समायोजन साधले नाही तर विकृती निर्माण होते.

## ४.४.१ समायोजन म्हणजे काय?

"कोणतीही समस्या निर्माण झाल्यानंतर ती सोडवण्याकरिता स्वत:मध्ये किंवा परिस्थितीमध्ये परस्परानुरुप बदल करणे म्हणजेच समायोजन होय."

समायोजन म्हणजे जुळवून घेणे, आपल्या गरजा, इच्छा यांचा भौगोलिक परिस्थितीशी मेळ घातला जातो.

"व्यक्तिला काहीवेळा तिच्या प्रेरणांचा, इच्छांचा त्याग करावा लागतो. प्रेरणांची पूर्तता करणे जेव्हा अशक्य होते तेव्हा मानसिक ताण निर्माण होण्याची शक्यता असते. ताण निर्माण होऊ नये म्हणून स्वत:च्या वर्तनात बदल करणे म्हणजे समायोजन होय."

## ४.४.२ समयोजनाचे प्रकार

१. बाहय समायोजन

२. वैयक्तिक समायोजन

३. सामाजिक समायोजन

## ४.४.३. समायोजनाची लक्षणे

१. वास्तववादी अभिवृत्ती : जीवनाकडे जर वास्तववादी दृष्टीकोणातून पाहिले गेले तर त्या व्यक्तिचे सुसमायोजन झाले असे म्हणता येईल.

२. सुरक्षिततेची भावना : सुसमायोजित व्यक्तिला स्वत: प्रमाणेच इतरांची काळजी, प्रेम व मालमत्तेची शाश्वती असते.

३. सृजनशीलता : ज्या व्यक्तिमध्ये नवनिर्माण करण्याची शक्ती असते, क्षमता असते, ती सुसमायोजीत व्यक्ति.

४. व्यवहारिक दृष्टीकोन : समायोजन करणे म्हणजे जीवनातील समस्याकडे भावनिकतेने न पाहता व्यावहारिक दृष्टीने पाहणे.

## ४.४.४. समयोजनाची गरज

समयोजन व्यक्ति जीवनातील समस्या सोडविण्यास मदत करते. स्वत:च्या जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन निश्चित होऊ शकतो व स्वत:च्या पात्रता, अभिवृत्ती, रुची, कल, त्रुटी इत्यादिंचा वास्तववादी विचार करणे शक्य होते. स्वत:च्या व इतरांच्या वर्तनात सुधारणा घडविणे शक्य होते.

संशोधिकेने संशोधनासाठी निवडलेल्या माध्यमिक शिक्षकांच्या समायोजन क्षमतेचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केलेला आहे. यासाठी डॉ. एस्. के. मंगल यांची शिक्षक समायोजन शोधिका वापरलेली आहे. या शोधिकेमध्ये त्यांनी पाच क्षेत्रांचा समावेश केला आहे ती खालीलप्रमाणे :

१. शालेय व सर्वसामान्य वातावरण समायोजन क्षमता.

२. सामाजिक मानसिक व भौतिक समायोजन क्षमता.

३. व्यावसायिक संबंध समायोजन क्षमता.

४. व्यक्तिगत जीवन समायोजन क्षमता.

५. आर्थिक व व्यावसायिक समाधान समायोजन क्षमता.

### ४.५.१. शालेय व सर्वसामान्य वातावरण क्षमता

शिक्षकांनी शिक्षक हा व्यवसाय स्विकारल्यानंतर त्याचा प्रामुख्याने सतत संबंध येतो तो शालेय वातावरणाशी यामध्ये प्रामुख्याने शाळेचा परिसर, शालेय इमारत तसेच इतर सहकारी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, मुख्याध्यापक तसेच संस्था व संस्थेचे पदाधिकारी इत्यादि घटकाशी शिक्षक म्हणून वावरत असताना त्याचा नित्याचा संबंध येत असतो आणि यावेळी या सर्व शालेय वातावरणामध्ये तो कशाप्रकारे सहभागी होतो त्याचे विद्यार्थ्यांशी संबंध कसे आहेत. तसेच मुख्याध्यापकाशी, पर्यवेक्षकाशी, सहकारी शिक्षकाशी, संस्था चालक व संस्थेचे पदाधिकारी यांच्याशी कशाप्रकारचे संबंध आहेत, याचबरोबर एक शिक्षक म्हणून त्याचे वर्तन कशाप्रकारचे आहे हे त्याचे या क्षेत्रातील त्याची समायोजन क्षमता कशी आहे यावरुन दिसून येते. शोधिकेच्या भाग १, ६ आणि ७ या भागामध्ये विचारलेल्या प्रश्नावरुन त्याची या क्षेत्रातील समायोजन क्षमता दिसून येते.

### ४.५.२ सामाजिक मानसिक व भौतिक समायोजन क्षमता

शिक्षक हा एक माणूस आहे. त्याचे जर मानसिक आरोग्य चांगले असेल तर समायोजन चांगल्या प्रकारे करु शकतो. नाही तर त्याच्यामध्ये विकृती निर्माण होते. यामध्ये प्रामुख्याने त्याची सामाजिक क्षमता म्हणजे समाजामध्ये वावरत असताना इतरांचा त्याच्याबद्दल असणारा दृष्टीकोन कसा असेल याची त्याला वाटणारी अनामिक भिती तसेच त्याची मानसिक क्षमता म्हणजेच त्याचे मन निरोगी असेल तर तो समायोजन चांगल्या पध्दतीने करु शकेल. संशोधिकेने वापरलेल्या शोधिकेमध्ये भाग २ व भाग ८ मध्ये शिक्षकांची सामाजिक, मानसिक व भौतिक समायोजन शोधण्यासाठी एकूण ८९ प्रश्नसंख्या आहे आणि त्याला मिळालेल्या गुणावरुन त्यांची या क्षेत्रातली समायोजन क्षमता तपासली आहे.

### ४.५.३ व्यावसायिक संबंध समायोजन क्षमता

शिक्षण हा व्यवसाय असा आहे की ज्याचा सतत संबंध मानवी घटकाशी येत असतो. शिक्षकी पेशा स्विकारल्यानंतर त्याचा अनेक मानवी घटक म्हणजेच संस्था चालक, शाळेचे मुख्याध्यापक, सहकारी शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, शिक्षक, प्राचार्य, शिक्षणाधिकारी तसेच विद्यार्थी, पालक समाजातील अन्य मानवी घटक इतरांशी त्यांचा सततचा नित्याचा संबंध येत असतो. हे त्याचे संबंध सकारात्मक असावयास हवे. तर त्याचे समायोजन चांगल्या प्रकारे होईल नाहीतर मनामध्ये एक प्रकारची विकृती निर्माण होईल.

शाळा संचनालयातील महत्वाचा घटक म्हणजे शाळेचा मुख्याध्यापक / प्राचार्य हया मुख्याध्यापकांच्या कार्यक्षमतेवरच शाळेचा दर्जा अवलंबून असतो. मुख्याध्यापक शिक्षकांच्या कुवतीनुसार त्यांच्या कार्यक्षमतेनुसार विविध कामे त्यांच्यावर सोपवित असतो. ती शिक्षकांनी पूर्ण करावीत, आपल्याला झेपणार नाहीत अशी कामे अकस्मात करतील तर त्या कामाचे स्पष्टीकरण देऊन मुख्याध्यापकाकडून ती बदलून घ्यावीत. शिक्षकांनी काही कामे उत्कृष्ट केल्यावर त्याचे श्रेय मुख्याध्यापकाला मिळते किंवा मुख्याध्यापक घेतात अशा वेळी शाळेचे हित लक्षात घेऊन विरोधाचा सुर न लावता संतोष मानावा. यामुळे शाळेच्या कार्यात अडथळा न येता शाळेची काम निर्विघ्न पार पडतील, तसेच मुख्याध्यापक, शिक्षक यांचे संबंध चांगले राहतील, इतर सहकारी शिक्षकांच्या तक्रारी याबाबत मुख्याध्यापकाना काही सांगू नये, काही सल्ला मुख्याध्यापकांनी विचारला तर सांगावा.

मुख्याध्यापकांना सर्व शालेय बाबतीत सहकार्य करावे, पण स्वत:वर जर अन्याय झाला तर त्याला सर्व शक्तीनिशी विरोध करावा. पण तो विरोध तात्विक असावा. सर्व शिक्षकांचे संस्थेच्या संचालकांशी फारसे संबंध येत नाहीत. पण कधी कधी ते शाळेला भेट देतात, शाळेच्या समारंभांना उपस्थित राहतात, शिक्षकांची ओळख करुन घेतात, संस्थेच्या संचालकाशी संबंध ठेवताना ते संबंध सकारात्मक असावेत. इतर शिक्षकांच्या चुगल्या संचालकांकडे करु नये. त्यांना योग्य तो मान द्यावा. पण त्यांची लाचारी पत्करु नये, त्यांच्या अवास्तव अपेक्षा पूर्ण करु नयेत. त्यांच्या मुलांना नातेवाईकांना अयोग्य सवलती देऊ नयेत.

संस्था संचालक मुख्याध्यापक यांच्या बरोबरच सहकारी शिक्षकांशी संबंध येतो. शाळेमध्ये विविध स्वभावाचे, वृत्तीचे, सहकारी शिक्षक असतात. काहीजण आपल्यापेक्षा अधिक वयाचे, अधिक सेवा झालेले तर काही कमी वयाचे कमी सेवा झालेले असतात. या सर्व सहकारी शिक्षकांशी मैत्रीचे, सहकार्याच संबंध ठेवावेत. इतर सहकारी शिक्षकांच्या अनुपस्थितीत त्यांच्या गुण दोषांची निंदा करु नये. शाळेतील

शिक्षकांच्या गटबाजीपासून अलिप्त रहावे. पण सर्वसाधारण गप्पात चर्चेत सामील व्हावे. पण शेरेबाजी करु नये. सहकारी शिक्षकांना अडचणींच्यावेळी मदत करावी. विद्यार्थ्यांसमोर सहकारी शिक्षकाची निंदा करु नये.

शिक्षकाचा वरील घटकाशिवाय नित्याचा संबंध येतो तो विद्यार्थ्यांशी. शिक्षकाचे विद्यार्थ्यांशी पुत्रपुत्रीवत प्रेमाचे सहानुभूतीचे त्यांच्या प्रगतीस उपयुक्त ठरणारे असे संबंध असावेत. विद्यार्थ्यांमध्ये आपल्याविषयी प्रेम निर्माण होण्यासाठी त्यांची अध्यापन पध्दती, मनोरंजक, प्रभावी असाव्यास हवी.

विद्यार्थी शिक्षकाशी हितगुज करु शकतील असे शिक्षकाचे व्यक्तीत्व असावे. शिक्षकाचे चारित्र्य शुध्द आदरणीय नसेल तो पक्षपाती भ्रष्टाचारी व्यसनाधीन पैशाचा लोभी असेल तर अशा शिक्षकाबद्दल विद्यार्थ्यांमध्ये आदर राहत नाही. यासाठी शिक्षकाचे आचरण शुध्द असावे. शिक्षा व बक्षीस यांचा वापर शिक्षकाने जपून करावा. गरीब, होतकरु, हुशार, जिद्दी विद्यार्थ्यांस सहानुभूती व मार्गदर्शक मदतीची गरज असते असे विद्यार्थी हेरुन त्यांना आवश्यक तेवढी मदत करावी. कोणत्याही बाबतीत पक्षपाती वृत्ती व कृती करुन दाखवू नका. विनाशाच्या वाटेवरची मुले विकासाच्या वाटेवर आणावीत अशाप्रकारे विद्यार्थ्यांशी शिक्षकाचे संबंध असावेत.

विद्यार्थ्यांशी संबंधाबरोबरच शिक्षकाचे पालकांशी संबंध असावेत. विद्यार्थ्यांच्या प्रगतीच्या दृष्टीने चारित्र्यसंवर्धनाच्या बाबतीत शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या पालकांशी संबंध ठेवले पाहिजेत यामुळेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळून शिक्षण पध्दती सुधारु शकेल.

### ४.५.४. व्यक्तिगत जीवन समायोजन क्षमता

शिक्षक हा सुध्दा मानव आहे. शिक्षकी व्यवसाय स्विकारल्यानंतर जशी त्याला वरील क्षेत्रामध्ये चांगल्या प्रकारे समायोजन साधावे लागते. त्याचप्रमाणे व्यक्तिगत जीवनामध्ये सुध्दा त्याला उत्तम समायोजन साधावे लागते. यामध्ये प्रामुख्याने स्वत:च्या कुटूंबाकडे दुर्लक्ष होऊ देऊ नये. कुटूंबातील वडील माणसांची विचारपूस सेवा आपुलकीने नम्रतेने केली पाहिजे. तसेच घरातील सर्व व्यवहार स्वत:च्या देखरेखखाली आपण स्वत: व आपल्या पत्नी – मुलांच्या सहायाने वेळोवेळी करायला हवेत. सर्व कुटूंबियांशी संवाद साधण्यासाठी दिवसाचा ठराविक वेळ राखून ठेवावा. आपल्या मुलांच्या शिक्षणाकडे तसेच त्यांच्यावर

संस्कार करणे, त्यांची विचारपूस करणे, याकडे लक्ष द्यायला हवे. मुलांचे मित्र, मुलांच्या चांगल्या सवयी याकडे लक्ष द्यावे. मुले ही फार महत्वाची संपत्ती असते पैसा, आडका, सत्ता, प्रतिष्ठा यांच्या मागे लागून मुलांची हेलसांड करु नये. शिक्षकांच्या आदर्श संसाराचा ताळ तोल हा कुटूंबातील सर्व सदस्यांनी सांभाळावा.

### ४.५.६. आर्थिक व व्यवसायिक समाधान

व्यापारी व्यापारात भरपूर (पैसा) नफा मिळाल्यावर समाधानी होतो. पगारदार व्यक्तिंना त्यांची पगारवाढ झाली की आनंद होतो. डॉक्टरांना त्यांच्या रुग्णाला रोगमुक्त केल्यावर वकिलांना त्यांच्या अशिलांना दावा जिंकून दिल्यावर आणि त्यांच्याकडून भरपूर फी मिळाली की त्यांना आनंद होतो. व्यवसायाचे समाधान होते. शिक्षकाला आपल्या व्यवसायाचे समाधान खालील गोष्टीतून झाल्याचे दिसून येते. काही शिक्षकांना त्यांच्या विद्यार्थ्यांना उत्तम प्रकारे शिकवून ते परीक्षेत उत्तम रीतीने उत्तीर्ण झाले की धान्यता वाटते. काही शिक्षकांना आपले विद्यार्थी गुणवत्ता यादीत चमकले की अध्यापन सार्थकी लागल्याचा आनंद होतो. काही शिक्षकांना वरिष्टांनी आपल्या कार्याचे कौतुक केले की समाधान वाटते. काही शिक्षकांना आपले विद्यार्थी उच्च पदस्त अधिकारी झाले की आपले शिक्षकी जीवन असे अभिमानाने सांगतात. म्हणजेच शिक्षकांचे व्यावसायिक समाधान म्हणजे त्यांचे विद्यार्थी ज्यांच्यावर त्यांनी चांगले संस्कार केलेले असतात, त्यांच्या वैयक्तिक जीवनाशी एकरुप होऊन त्यांच्या जीवनाला उज्वल रुप दिलेले असते. त्यांना विनाशकारी मार्गावरुन विकासाच्या मार्गावर आणलेले असते पुढे हेच विद्यार्थी ज्या ज्या क्षेत्रात जातात. त्या क्षेत्रात आपल्या गुरुने केलेल्या संस्कारामुळे आपले स्थान उच्च पदावर टिकवून ठेवतात. तेव्हा या शिक्षकांना विद्यार्थ्यांचे हे कौतूक बघून त्यांच्या शिक्षकी व्यवसायाचे समाधान होते.

## ४.६. समारोप

या प्रकरणामध्ये मूल्ये व समायोजनक्षमता याची तात्विक माहिती व प्रस्तुत संशोधनासाठी निवडलेली सहा मूल्ये व पाच्य क्षेत्रातली समायोजन क्षमता या संदर्भात माहिती दिली आहे. पुढील प्रकरण क्र. ५ मध्ये शिक्षकांना दिलेल्या मूल्य अध्ययन चाचणी व शिक्षक समायोजन शोधिका यामधून मिळालेल्या माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन केले आहे.